


महाराष्ट्राच्या उभारणीत एस. बी. पाटील यांचे मोलाचे योगदान - मधूकर भावे

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | सोमवार दिनांक 15/09/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 217 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना गगनभेदी मानवंदना


## स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'च्या साक्षीने ढोल-ताशा पथकांनी रचला इतिहास

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

आसमंत उजळून टाकणारे भगवा ध्वज... ढोल-ताशांचा गगनभेदी निनाद...आणि मर्दानी खेळ सादरकरणाऱ्या मावळ्यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके... आणि त्याला शिवगीत सादरकर्ते अवधुत गांधी यांच्या मावळी सुरांची साथ... शिव-शंभूभक्तांची अफाट गर्दी... आणि साक्षात वरुणराजाचा जलाभिषेक... असा ना भूतो ना भविष्यती अनुभव हजारो शिव-शंभूप्रेमी आणि पिंपरी-चिंचवडकरांनी घेतला. निमित्त होते, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वात उंच शिल्प आणि शंभू सृष्टीला ढोल-ताशांची रोमहर्षक ऐतिहासिक मानवंदनेचे.





हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ला ऐतिहासिक मानवंदना सोहळ्याचे आयोजन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे करण्यात आले होते. या निमित्ताने हजारो शिव-शंभू भक्तांनी या ठिकाणी तुफान गर्दी केली. विशेष म्हणजे, पावसाने जोरदार हजेरी लावलेली असतानाही हा सोहळा अक्षरश: ‘रेकॉर्ड ब्रेक’ ठरला.

शिव गीतांचे प्रसिद्ध गायक अवधूत गांधी यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरणी मानवंदना सादर केली. यानंतर हिंदू भूषण ट्रस्ट स्मारकाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. “युगत मांडली...”, “शिवरायांच्या बुद्धीयुक्तीचा लागना पारं..” , “शिवबा राजं... शिवबा राजं...” अशा गीतांवर हजारो प्रेक्षक आणि वादकांनी ताल धरला.

ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावत शिवशंभूच्या विचारांना पुढे चालवण्यासाठी “धर्मनिष्ठा, कर्मनिष्ठा” हेच ब्रीद ठेवून काम करणारे आमदार महेश लांडगे आहे असे सांगत "आय लव्ह यु दादा" असे म्हटले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील तमाम शिवशंभु प्रेमी, पिंपरी-चिंचवड शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. शिववंदना आणि ध्वज प्रणामाने सोहळ्याचा समारोप करण्यात आला. यावेळी ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ च्या आवारात जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

शंभू राजांना अभिप्रेतकाम ट्रस्ट करेल...

यावेळी स्मारकाचा उद्देश आयोजकांतर्फे जाहीर करण्यात आला. प्रा. इंद्रजीत भोसले यांनी स्मारकाची उद्दिष्टे यावेळी जाहीर केली ते म्हणाले की, हिंदू भूषण स्मारक ट्रस्ट पिंपरी-चिंचवडची स्थापना सन 1860 संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम 20 अन्वये करण्यात आलेली आहे. स्मारकाचा उद्देश तरुण पिढीमध्ये हिंदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे विचार भावी पिढ्यापर्यंत आणि जगभरात प्रचार प्रसार करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे विचार स्वातंत्र, पराक्रम धर्मनिष्ठा, ज्ञाननिष्ठा आणि स्वराज्य रक्षणासाठी समर्पित होते त्यांनी आपल्या धर्माचे आणि संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले त्यांच्या विचारांना समर्पित असे काम ट्रस्ट येणाऱ्या कालावधीत करेल.

दाही दिशा शिव-शंभूंसमोर नतमस्तक...

हजारो शिवशंभु प्रेमी, ढोल ताशा वादक यांच्या माध्यमातून गगनभेदी मानवंदना छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरणी अर्पण करण्यात आली. या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी वरुण राजाने देखील हजेरी लावली. ढोल ताशांच्या गजरातील मानवंदनेने आसमंती एकच गगनभेदी गजर झाला. दाही दिशा 'शिवशंभू'च्या नावापुढे नतमस्तक झाल्या. 3 हजारपेक्षा अधिक ढोल, 1 हजारपेक्षा अधिक ताशा, तसेच 500 ध्वजांच्या गजरात मानवंदना देण्यात आली.

अचूक नियोजन अन् महाराष्ट्रभरातून पथके...

महाराष्ट्रातील शंभरहून अधिक नामांकित ढोल-ताशा पथके यात सहभागी झाली होती. कार्यक्रमासाठी पार्किंग, भोजन, पिण्याचे पाणी, तसेच वैद्यकीय सेवा अशा आवश्यक सर्व सुविधा सज्ज होत्या. नियोजित आणि चोख नियोजनामध्ये हा कार्यक्रम हजारोंच्या उपस्थितीत पार पडला.या मानवंदनासाठी महाराष्ट्रातून अनेक नावाजलेले ढोल ताशा पथक सहभागी झाले. दरम्यान, पुणे, पिंपरी-चिंचवड लगतच्या अनेक भागातून शिवशंभु प्रेमींनी या मानवंदनेचा ऐतिहासिक सोहळा पाहण्यासाठी हजेरी लावली होती.

“लंडन बूक ऑफ रेकॉर्ड” मध्ये नोंद...

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे हे स्मारक जगातील सर्वात उंच म्हणून नोंद झाली आहे. याशिवाय आज देण्यात आलेली मानवंदना यासाठी ढोल ताशा पथकांची उपस्थिती हे देखील नोंद पहिल्यांदाच झाली असून, याबद्दल “लंडन बुक ऑफ रेकॉर्ड” द्वारा हिंदू भूषण ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांना गौरविण्यात आले आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

संतपीठ, मर्दानी खेळांनी लक्ष वेधले...

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या शिल्पासमोरील समोरील मानवंदना कार्यक्रमांमध्ये मर्दानी खेळ लक्ष वेधून घेत होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे चिखली येथील संतपिठाच्या माध्यमातून कीर्तन सादर करण्यात आले. बाल शिवभक्ताची शिवगर्जनाही लक्षवेधी ठरली.

# 'कूस' लघुपटाला राज्यस्तरीय तिसरे पारितोषिक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य व त्यांचे जगणे मांडणाऱ्या 'कूस' या लघुपटाला राज्यस्तरीय उत्कृष्ट लघुपट म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या लघुपटाची निर्मिती उचित मीडिया सर्व्हिसेसने केली असून, दिग्दर्शन व लेखन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त या लघुपट महोत्सवाचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत आगीनफूल लघुपटास प्रथम, तर चंद्रलेखा लघुपटास द्वितीय पारितोषिक मिळाले. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व प्रसिद्ध




अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते 'कूस' लघुपटाच्या टीमला सन्मानित करण्यात आले. घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे, चित्रपट महामंडळाचे मेघराज राजेभोसले, अभिनेत्री देविका दफ्तरदार, अभिनेते मिलिंद दास्ताने, सुनील गोडबोले, प्रभाकर मोरे, असित रेडीज, राष्ट्रवादीच्या नेत्या वैशाली नागवडे, रुपाली ठोंबरे, बाबा धुमाळ, संयोजक बाबासाहेब पाटील, नितीन धवणे पाटील, आदित्य संजयराव, अपेक्षा चव्हाण आदी उपस्थित होते. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले.बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे जगणे, त्यांच्या मासिक पाळीचा व आरोग्याचा प्रश्न, गर्भाशय पिशवी काढण्याचे प्रकार आणि त्यातून होणारी त्या स्त्रीची, कुटुंबाची कुचंबणा आदी गोष्टी या लघुपटातून मांडण्यात आल्या आहेत.

डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांच्याच अनेक पुरस्कारप्राप्त 'कूस' या कादंबरीवर आधारित हा लघुपट असून, निर्माता व लेखक-दिग्दर्शक ऊसतोड मजूर कुटुंबातून आल्याने अतिशय वास्तविक रूपात तो मांडला गेला आहे. विठ्ठल काळे यांच्यासह अनुया कळसकर, वैशाली केंजळे, डॉ. सोनाली घाटणेकर, अनिल कांबळे व जीवराज चोले यांच्या यामध्ये प्रमुख भूमिका आहेत.

निर्माता जीवराज चोले व दिग्दर्शक डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी हे पारितोषिक स्वीकारले. ५५,५५५/- रुपये, मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. अभिनेता विठ्ठल काळे यांना उत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार मिळाला. यावेळी कार्यकारी निर्माती तेजस्विनी थिटे, अभिनेता अनिल कांबळे, अभिनेत्री डॉ. सोनाली घाटणेकर, वेशभूषाकार भाग्यश्री राऊत, केशभूषाकार प्राजक्ता लोंढे, सहायक कलादिग्दर्शक लखन चौधरी

# भारत पाकिस्तान क्रिकेट खेळण्यास परवानगी देणाऱ्या केंद्र सरकार विरोधात शिवसेनेचे आंदोलन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भारत पाकिस्तान क्रिकेट सामना आशिया कप आज दुबई येथे खेळला जात आहे. भारताने पाकिस्तान सोबत सर्व संबंध तोडले आहे तर क्रिकेट हा खेळ तरी का खेळायचा ? असा प्रश्न उपस्थित करत या विरोधात निषेध व्यक्त करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने राज्यव्यापी आंदोलन होत आहे.

पिंपरी चिंचवड शहरात "माझं कुंकू माझा देश आंदोलन" शिवसेना पक्षाच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर




चौकात करण्यात आले.

पहेलगाम आतंकवादी हल्ल्यात हात असलेल्या पाकिस्तान विरुद्ध क्रिकेट खेळण्यास परवानगी देणाऱ्या दुट्टप्पी केंद्र सरकार विरोधात हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाच्या वेळी जिल्हाप्रमुख माजी आमदार गौतम चाबुकस्वार, जिल्हा संघटिका अनिता तुतारे n शहर प्रमुख रुपाली ताई आल्हाट ,नगरसेविका मीनल यादव, उपजिल्हाप्रमुख रोमी संधू विधानसभा प्रमुख हरेश नखाते, युवासेना समन्वयक निखिल दळवी, उपशहर युवासेना,शिवाजी कुरहडकर, दत्ताराम साळवी, विभाग प्रमुख गजानन धावडे,नाथाभाऊ खांडेभराड सचिन खोमणे, रविराज मांडवे,दिलीप दंडवते,तुषार नवले, संतोष म्हात्रे, विभाग प्रमुख संदीप भालके, विजय साने, कृष्णा येळवे, भरत शिंदे,ज्ञानेश्वर शिंदे,

कल्पना शेटे ,योगिनी मोहन , ज्योती भालके ,सुषमा शेलार ,गौरी घंटे, कलावती नाटेकर ,तसलीम शेख ,सुषमा आल्हाट ,सारीका जांभुळकर असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

# जीवनातील अंधकार दूर करण्यासाठी पुणेकरांचा 'कँडल मार्च'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी कँडल मार्चचे आयोजन केले होते. आत्महत्या प्रतिबंधासाठी गेल्या वीस वर्षांपासून कार्यरत असलेल्या कनेक्टिंग ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ पुणे सारसबाग यांच्या पुढाकारातून हा कँडल मार्च संभाजी उद्यान, जंगली महाराज रस्ता पुणे येथून निघून श्रेयस बँक्वेट, आपटे रस्ता येथे समाप्त झाला.




या कँडल मार्चमध्ये रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज, रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ, रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूड, रोटरी क्लब ऑफ पुणे सहवास, रोटरी क्लब ऑफ पुणे मिडईस्ट, रोटरी क्लब ऑफ पुणे ईस्ट, रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईज या क्लबचे सहकार्य लाभले.

कनेक्टिंग ट्रस्टच्या संस्थापिका अर्णवाज दमानिया, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रणिता मडकईकर, समन्वयक गायत्री दामले, विरेन राजपूत, रोटेरियन सुमेधा भोसले, रोटरी क्लब सारसबागचे आशुतोष वैद्य, रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या अध्यक्षा मनिषा बेळगावकर, रोटरी क्लब ऑफ पुणे सहवासच्या रुमा आगवेकर, मिडईस्टचे अध्यक्ष रोशन, रोटरी क्लब ऑफ पुणे ईस्टच्या अध्यक्षा अलका ओसवाल, रोटरी क्लब ऑफ पुणेचे अध्यक्ष जीवराज चोले, रोटरॅक्टचे समन्वयक सुमित गीते आदी उपस्थित होते.

श्रेयस बँक्वेट येथे आत्महत्या प्रतिबंध जागृती करणाऱ्या नाट्यछटांचे सादरीकरण झाले. जीवनातील अंधकार दूर करून आरोग्यदायी आयुष्य जगण्याची प्रेरणा देणारा हा कँडल मार्च होता.

अर्णवाज दमानिया म्हणाल्या, "वीस वर्षांपूर्वी आत्महत्या प्रतिबंधासाठी काम सुरु केले, तेव्हा हा विषय निषिद्ध मानला जात होता. मात्र, आज आत्महत्येच्या विचारांपासून परावृत्त करण्याच्या या अभियानात तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी होते, हे पाहून आनंद वाटतो. एकांत, शांतता ही मनाला खात असते.

त्यामुळे संवाद करणे, एकमेकांना समजून घेणे गरजेचे आहे.

नैराश्य, दडपण, मानसिक कोंडी होत असेल, तर मन मोकळे करायला हवे. मनावर ओझे घेऊन जगत राहिलो, तर मनातील वाईट विचार प्रबळ होत जातात आणि आपण टोकाच्या विचारांकडे जातो.

"सुमेधा भोसले, अल्पना वैद्य यांनीही मनोगते व्यक्त केली. गायत्री दामले यांनी सुत्रसंचालन केले. मार्चमध्ये सहभागी स्वयंसेवकांनी हातामध्ये जनजागृतीपर फलक घेतले होते.

# पिंपरीत पाळीव श्वानाची क्रूरतेने हत्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड : पिंपरी-चिंचवडमध्ये क्रूरपणे लाकडी दंडक्याने बेदम मारहाण करून श्वानाची हत्या करण्यात आली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही देखील समोर आला आहे. अज्ञात व्यक्तीने पाळीव श्वानाची हत्या केल्याने प्राणीमित्रांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.आकुर्डी येथील पेट्रोल पंपाजवळ हस्की नावाच्या श्वानाची शनिवारी हत्या करण्यात आली. हस्की रुक्मिणी गलांडे यांनी तक्रादर



राहुल सदाशिव मारकर यांना काही दिवस सांभाळण्यासाठी दिला होता. परंतु, अज्ञात व्यक्तीने हस्की (श्वान) चा अक्षरशः लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या जबर मारहाणीत रक्तबंबाळ झालेल्या श्वानाचा मृत्यू झाला आहे.मृत्यू झाल्यानंतर त्याचा मृतदेह फरफटत रस्त्यावर नेण्यात आला. अत्यंत क्रुरतेने श्वानाला मारहाण करून हत्या केल्याने प्राणीमित्रांमध्ये संताप आहे.




या प्रकरणी निगडी पोलिसांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बी.एन.एस कलम ३२५, प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम नुसार हा गुन्हा दाखल केला आहे. अशी माहिती निगडी पोलीस ठाण्याचे गुन्हे पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ यांनी दिली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
सोमवार दिनांक 15/09/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# वाघोली-बकोरी रोड बनविण्यासाठी वाकोचे बकोरी फाटा येथे आमरण उपोषण, दुसरा दिवस

## मागणी मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करीत पाण्याचा ही त्याग करणार




>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, : वाघोली येथे गेल्या दशकांपासून प्रलंबित असलेल्या बकोरी रोड समस्येबाबत नागरिकांचा संताप आता तीव्र झाला आहे. याच अनुषंगाने समाजसेवी आणि लोक कल्याणकारी संस्था वाघोली अगेन्स्ट करप्शन ऑर्गनायझेशन (टीम वाको) च्या नेतृत्वाखाली एक आमरण उपोषण आंदोलन सुरु करण्यात आले असून आज अन्न त्यागाचा दुसरा दिवस असून जर प्रशासनाने उद्या ठोस निर्णय घेतला नाही तर पाणी त्याग करण्याचा निर्णय अनिल कुमार मिश्रा यांनी दिला आहे.

बकोरी फाटा ते बकोरी रस्ता या विकास कामांच्या अनुषंगानं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूचना दिल्या, परंतू आम्हाला लेखी स्वरूपात रस्ता केव्हा पुर्ण होणार याची ग्वाही प्रशासनाने अद्याप दिली नाही. आणि जो पर्यंत लेखी स्वरूपात देजत नाही तो पर्यंत आंदोलन असेच सुरु ठेवणार आहे. अशी माहिती

अनिल कुमार मिश्रा यांनी दिली. बकोरी मधील विविध सोसायटीकडून सुमारे 30 सोसायटीकडून समर्थन देण्यात आले आहे. बिल्डर्स यांच्या संगनमतामुळे टाऊन प्लॅनिंगमध्ये दाखवलेला 60 फूट बकोरी रोड प्रत्यक्षात कधीच उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. तरीसुद्धा बिल्डर्सना परवानग्या, टाऊन प्लॅनिंग मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले. नागरिकांकडून कर व विकास शुल्क वसूल करूनही आज रस्ता नाही, केवळ 9 फूट अरुंद रस्त्यावर जीव धोक्यात घालून रहिवाश्यांना प्रवास करावा लागतो. या फसवणुकीमुळे दररोज गंभीर अपघात, ट्रॅफिक कोंडी व प्रचंड हाल अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. याच साठी स्थानिक रहिवाशी रस्त्यावर उतरले असून आमरण उपोषणास बसले आहे. काल शनिवार 13 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 10 वाजल्यापासून उपोषण सुरु केले असून आज सायंकाळ पर्यंत प्रशासनाने याची कसली ही दखल घेतली नाही. यामुळे आणिखीन संतापाची लाट निर्माण झाली आहे. पीएमआरडीए ने अनेक टाऊन प्लॅनिंग मंजुरी रस्ता अस्तित्वात नसताना कशा दिल्या, याची चौकशी करून दोषी बिल्डर्स व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.-आजपर्यंत कलेक्टर व संबंधित प्रशासनाने नागरिकांना बकोरी रोड उपलब्ध करून का दिला नाही, याबाबत स्पष्ट व लेखी खुलासा करण्यात यावा. शासनाने आवश्यक जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा. -वाघोली शहरातील बकोरी रोड तसेच इतर रस्ते तातडीने रुंदीकरण करून सुरक्षित व मान्यताप्राप्त रस्ते नागरिकांना उपलब्ध करून द्यावेत, अश्या मागण्या टीम वाकोचे अध्यक्ष अनिल कुमार मिश्रा यांनी केलेल्या आहेत.

हे आंदोलन बकोरी रोड उपलब्धते सारख्या मूलभूत गरजेसाठी आहे. जोपर्यंत प्रशासन ठोस कार्यवाही करत नाही, तोपर्यंत आमरण उपोषण सुरू राहील.या आंदोलनात वाघोली व बकोरी रोड परिसरातील हजारो नागरिकांची मोठ्या प्रमाणात समर्थन देत आहेत.

# महाराष्ट्राच्या उभारणीत एस. बी. पाटील यांचे मोलाचे योगदान - मधूकर भावे

## पीसीईटी मध्ये 19 व्या स्मृतिदिनानिमित्त एस. बी. पाटील यांना अभिवादन





>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्याच्या कृषी, औद्योगिक विकासावर भर देण्यात आला. तो काळ १९६० चा होता. त्यावेळी यशवंतराव चव्हाण, आचार्य अत्रे, केशवराव जेधे यांच्या दूरदृष्टी नेतृत्वासोबत शंकरराव बाजीराव पाटील ऊर्फ भाऊ यांनी जबाबदारीने कार्य केले.

भाऊंनी रोजगार हमी योजनेतील कामगारांना वेतन आणि धान्य देण्याचा निर्णय, कामगारांना किमान वेतन मिळाले पाहिजे, शेतकऱ्यांनी कष्टाने पिकविलेल्या धान्याला योग्य दाम मिळावे यासाठी राज्याला नव्हे तर संपूर्ण देशाला दिशा देणारे कायदे विधीमंडळात संमत करून घेतले. भाऊंच्या कार्याची चुणूक महाराष्ट्राला पहायला मिळाली. भाऊंनी सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले. याचे अनुकरण आजच्या काळात केले पाहिजे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत ज्येष्ठ पत्रकार, संपादक मधूकर भावे यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) संस्थापक अध्यक्ष स्व. शंकरराव बाजीराव पाटील यांच्या १९ व्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी (१३ सप्टेंबर) पीसीईटीच्या निगडी येथील सभागृहात मधूकर भावे यांचे "भाऊंचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी पीसीईटीच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयु अभ्यास मंडळाचे सदस्य सचिन इटकर उपस्थित होते.पिंपरी चिंचवड शहर आणि परिसरातील सर्वसामान्य जनतेच्या मुलांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे, या उद्देशाने भाऊंच्या नेतृत्वाखाली पीसीईटी एज्युकेशन ट्रस्टची स्थापना करण्यात आली. छोट्याशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले, हे पाहून आनंद वाटतो, असे विठ्ठल काळभोर यांनी प्रास्ताविकात सांगितले.भाऊंचा १९६१ ते १९७८ हा विधानसभेतील काळ मला जवळून पाहता आला. ते सहा वेळा आमदार झाले.१९५७ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसची धुळधाण उडाली मात्र भाऊ पाच हजारांच्या मताधिक्याने विजयी झाले, अशी आठवण भावे यांनी यावेळी सांगितली. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन माधुरी ढमाले यांनी केले. पीसीईटी शैक्षणिक समुहातील सर्व संस्था, महाविद्यालये, शाळांचे प्राचार्य, संचालक, प्राध्यापक, कर्मचारी व्याख्यानास उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579